ISSN: P-2455-0515
E- 2394-8450

Educreator Research Journal

VOLUME–IX, ISSUE– V SEPT – OCT 2022

Original Research Article

# प्राथमिक शिक्षणाच्या सार्वत्रिकीकरणासाठी राबविल्या जाणाऱ्या विविध योजनांची अंमलबजावणी: एक अभ्यास

*प्रकाश तुकाराम चव्हाण,
** प्रा.डॉ.कैलास आर.खोंडे,

*संशोधक विद्यार्थी पीएचडी, वसुर तांडा पो.वसुर ता.मुखेड जि.नांदेड – ४३१७१५
**मार्गदर्शक, म.वि.प्र.समाज शिक्षणशास्त्र विद्यालय नासिक

**सारांश :**

*प्राथमिक शिक्षणाच्या सार्वत्रिकीकरणासाठी शासनाकडूनप्राथमिक शाळांमध्ये वेगवेळ्या प्रकारच्या योजना राबविल्या जातात. या योजनांमुळे प्राथमिक शाळांमध्ये शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांच्या संख्येत लक्षणीय वाढ झाली. शिक्षणापासून वंचित राहणाऱ्या समाजातील अनेक विद्यार्थ्यांना शाळेत व शिक्षणाच्या प्रवाहात आणणे शक्य झाले.*

*तथापि प्राथमिक शाळांमध्ये दाखल झालेले विद्यार्थी त्यांचे प्राथमिक शिक्षण पूर्ण होई पर्यंत शाळांमध्ये टिकवून ठेवणे खूप आवश्यक आहे या साठी केंद्र शासन व महाराष्ट्र शासन यांच्या तर्फे वेगवेळ्या प्रकारच्या योजना राबविल्या जातात. या योजनांचा शिक्षणाच्या सार्वत्रिकीकरणात महत्त्वाचा वाटा आहे.मात्र बऱ्याचदा या योजना राबविताना पुरेसा निधी वेळेवर उपलब्ध न होणे, पुरेसे मनुष्यबळ नसणे,पर्यवेक्षीय यंत्रणांचे दुर्लक्ष आदी कारणांमुळे योजनांची अमलबजावणी करण्यात अडचणी निर्माण होतात.या अडचणी जाणून घेणे व त्यावर उपाय योजना शोधणे गरजेचे वाटले म्हणून प्रस्तुत संशोधन गरजेचे वाटले म्हणून प्रस्तुत विषय घेऊन संशोधनाचा प्रयत्न केला आहे.*

**Copyright © 2022 The Author(s):** This is an open-access article distributed under the terms of the Creative Commons Attribution 4.0 International License (CC BY-NC 4.0) which permits unrestricted use, distribution, and reproduction in any medium for non-commercial Use Provided the Original Author and Source Are Credited.

## १. प्रास्ताविक:

शिक्षण हक्क अधिनियम-२००९ हा भारतीय संविधानाच्या कलम २१-अ अंतर्गत ६ते १४वर्षे वयोगटातील बालकांना मोफत आणि सक्तीचे शिक्षण उपलब्ध करण्याची तरतूद करतो. १एप्रिल २०१०रोजी हा कायदा भारतात अस्तित्वात आला आणि शिक्षण हा प्रत्येक बालकाचा मूलभूत हक्क असल्याचे मान्य करणा-या १३५देशांच्या यादीत भारताला स्थान लाभले. महाराष्ट्र शासनाने सुद्धा १० मे २०१० रोजी एक पत्रक काढून प्राथमिक शिक्षणाचा समावेश मुलभूत अधिकारात करीत असल्याचे घोषित केले आहे .

असे असले तरीही शासनाचे शिक्षणाचे सार्वत्रिकीकरणाचे धोरण यशस्वी व्हावे, विदयार्थ्यांना प्राथमिक शिक्षणाची गोडी लागावी यासाठी शासनामार्फत विविध योजना राबविण्यात आल्या आहेत.

महाराष्ट्र शासनातर्फे प्राथमिक शिक्षणाच्या सार्वत्रिकीकरणासाठी राबवल्या जाणाऱ्या विविध योजना.

१) मोफत पाठ्यपुस्तके योजना

२) मोफत गणवेश योजना

३) मध्यान्ह भोजन योजना

४) इत्यादी

यासारख्या विविध योजनामहाराष्ट्रातील प्राथमिक शाळांमध्ये शिक्षण घेणाऱ्या बालकांसाठी राबविल्या जात असल्या तरीही ग्रामीण भागातील व शहरातील झोपडपट्टी भागातील सर्वच बालके शिक्षणाच्या प्रवाहात आली आहेत असे म्हणता येणार नाही.

त्यामुळेच या योजनांची अंमलबजावणी योग्य रीतीने होते आहे किंवा नाही हे तपासून पाहणे, त्या योजनांचा शास्त्रशुद्ध व मूल्यमापनात्मक अभ्यास करणे संशोधकाला गरजेचे वाटते.या पार्श्वभूमीवर प्रस्तुत संशोधन हाती घेण्यात आले आहे.

**२. समस्या विधान:**

महाराष्ट्र राज्यामध्ये प्राथमिक शिक्षणासाठी राबविल्या जाणाऱ्या विविध विद्यार्थी लाभाच्या योजनांची अंमलबजावणीप्रभावीपणे होते आहे का याचा शोध घेणे.

**३. संशोधन समस्येचे स्पष्टीकरण:**

शिक्षणाचा अधिकार अधिनियमानुसार प्रत्येक मुल शाळेत दाखल व्हावे व दाखल झालेली सर्व मुले शिक्षण प्रवाहात टिकून रहावीत त्यांच्या शिक्षणविषयक गरजा शाळेतच पूर्ण व्हाव्यात,त्यांनाप्राथमिक शिक्षणाची गोडी लागावी यासाठी शासनामार्फत विविध योजना राबविण्यात आल्या.

त्यामध्ये मोफत पाठ्यपुस्तके, मोफत गणवेश,मध्यान्ह भोजन, मुलींसाठी उपस्थिती भत्ता यासारख्या विविध योजना प्राथमिक शिक्षणामध्ये राबविण्यात आल्या. महाराष्ट्र शासन या सर्व योजना राबवण्यासाठी एकूण वित्तीय महसूल खर्चापैकी सुमारे१/६ भाग सर्वसाधारण शिक्षणावर खर्च करते.तरीसुद्धा शाळाबाह्य बालके सापडतच आहेत.त्यामुळे या विद्यार्थी लाभाच्या योजनांचे मूल्यमापन करणे क्रमप्राप्त ठरते.

**४. संशोधन समस्येतील महत्त्वाच्या शब्दांच्या कार्यात्मक व्याख्या:**

**अ) प्राथमिक शिक्षण:**

प्राथमिक शाळांमध्ये ६ ते १४ वयोगटातील विद्यार्थ्यांना दिले जाणारे वाचन,लेखन व गणिती क्रियांचे शिक्षण म्हणजे प्राथमिक शिक्षण होय.असा अर्थ येथे अभिप्रेत आहे.

ISSN: P-2455-0515
E- 2394-8450

Educreator Research Journal

VOLUME–IX, ISSUE– V SEPT – OCT 2022

Original Research Article

**आ) विद्यार्थी:**

प्राथमिक शाळांमध्ये शिक्षण घेणारे विद्यार्थी. असा अर्थ प्रस्तुत संशोधना संदर्भात अभिप्रेत आहे.

**उ) योजना:**

ठाणे जिल्ह्यातील शहापूर व भिवंडी या तालुक्यातील प्राथमिक शाळांमध्ये विद्यार्थ्यांना शिक्षण घेण्यास प्रोत्साहन देण्यासाठी राबवल्या जाणाऱ्या विविध लाभाच्या योजना.

**ऊ) अंमलबजावणी:**

ठाणे जिल्ह्यातील शहापूर व भिवंडी या तालुक्यातील प्राथमिक शाळांमध्येशासनाकडील विविध योजना प्रत्यक्षात राबविल्या जाणे म्हणजे अमलबजावणी असा अर्थ प्रस्तुत संशोधना संदर्भात अभिप्रेत आहे.

**ए) अभ्यास:**

ठाणे जिल्ह्यातीलप्राथमिक शाळांमध्ये राबवल्या जाणाऱ्या विविध विद्यार्थी लाभाच्या योजनांची प्रश्नावली व्दारे माहिती संकलित करून विद्यार्थ्यांची शाळेतील वाढलेली उपस्थिती,विद्याथ्यांची संपादणूक पातळी व अध्ययनातील गोडी जाणून घेणे म्हणजे अभ्यास होय.

**५. संशोधन प्रश्न:**

१. महाराष्ट्र राज्यातील प्राथमिक शाळांमध्ये शिक्षणाचा प्रचार,प्रसार व्हावा यांसाठी कोणकोणत्या योजना राबवल्या जातात ?

२. महाराष्ट्र राज्यातील प्राथमिक शाळांमध्ये राबवल्या जाणाऱ्या योजनांपैकी विद्यार्थ्यांची उपस्थिती टिकवण्यासाठीच्या कोणकोणत्या योजना आहेत?

३. महाराष्ट्र राज्यातील प्राथमिक शाळांमध्ये राबवल्या जाणाऱ्या योजनांमुळे प्राथमिक शाळांमधील गळती स्थगिती चे प्रमाण कमी झाले का?

४. महाराष्ट्र राज्यातील प्राथमिक शाळांमध्ये राबवल्या जाणाऱ्या योजनांना शासनाकडून वेळेवर निधी प्राप्त होतो का?

५. महाराष्ट्र राज्यातील प्राथमिक शाळांमध्ये राबविण्यात येणाऱ्या विद्यार्थी लाभाच्या योजनांमुळे शाळाबाह्य बालके शिक्षणाच्या प्रवाहात येतात का?

६. महाराष्ट्र राज्यातील प्राथमिक शाळांमध्ये राबविण्यात येणाऱ्या योजनांचा मागासवर्गीय विद्यार्थ्यांना काय फायदा झाला?

ISSN: P-2455-0515
E- 2394-8450

Educreator Research Journal

VOLUME–IX, ISSUE– V SEPT – OCT 2022

Original Research Article

**६. संशोधनाची उद्दिष्टे:**

१. महाराष्ट्र राज्यातील प्राथमिक शाळांमध्ये राबविल्या जाणाऱ्या विद्यार्थी लाभाच्या योजनांचा अभ्यास करणे.

२. महाराष्ट्र राज्यातील प्राथमिक शाळांमध्ये राबविल्या जाणाऱ्या योजनांमधील त्रुटी शोधून उपाययोजना सुचविणे.

**७. संशोधनाची गृहीतके:**

१. शाळाबाह्य मुले ही शिक्षणाच्या सार्वत्रिकीकरणातील जटील समस्या आहे.

(संदर्भ : महाराष्ट्र टाइम्स दिनांक ७ मार्च २०२१) https://maharashtratimes.com/editorial/ravivar-mata/dr-shrirang-deshpane-article-on-issue-of-out-of-school-children/articleshow/81377639.cms

२. शाळाबाह्य,अनियमित व स्थलांतरित मुलांना शाळेच्या प्रवाहात दाखल कण्यासाठी विशेष शोध मोहीम राबविणे गरजेचे आहे.

(संदर्भ :शासन निर्णय क्रमांक संकीर्ण – २०२१/प्र.क्र.२१/एसडी -४,दिनांक २३ फेब्रुवारी २०२१)

३. कोरोनामुळे बालकामगारांचे प्रमाण वाढले, शाळाबाह्य मुलांना शिक्षण प्रवाहात आणण्याची गरज आहे.

(संदर्भ : ETV,दिनांक ८जून २०२१)

https://www.etvbharat.com/marathi/maharashtra/city/nashik/has-been-an-increase-in-the-number-of-child-laborers-during-corona-disease/mh20210608171558295

४. राज्यात पहिली ते आठवी पर्यंत शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांना सर्व शिक्षा अभियानांतर्गत मोफत पाठ्यपुस्तके देणारी योजना प्रभावीपणे राबवली जात नाही.

(संदर्भ : अतारांकित प्रश्न क्रमांक १६९४१दिनांक १०/०८/२०१५ )

http://mls.org.in/newpdf/unstarred_question_yaadi_229%20of%202016.pdf

५. विद्यार्थ्यांचा शैक्षणिक दर्जा खालावल्याने महापालिकेतील शाळांची पटसंख्या कमी झाली आहे.

(संदर्भ : दैनिक सकाळ, दिनांक १८ जुलै २०१७)

https://www.esakal.com/pune/pune-news-municipal-school-education-60400

**८. संशोधनाची व्याप्ती व परीमर्यादा:**

**१. संशोधनाची व्याप्ती:**

१. प्रस्तुत संशोधन हे सापगाव (ता.शहापूर जि.ठाणे) केंद्रात राबविल्या जाणाऱ्या विद्यार्थी लाभाच्या

ISSN: P-2455-0515
E- 2394-8450

Educreator Research Journal

VOLUME–IX, ISSUE– V

SEPT – OCT 2022

Original Research Article

योजनांच्या मूल्यमापनात्मक अभ्यासाशी सबंधित आहे.

२. सदर संशोधनाच्या अभ्यासामुळे प्राथमिक शिक्षणासाठी महाराष्ट्रामध्ये राबविल्या जाणाऱ्या विद्यार्थी लाभाच्या योजनांचा अभ्यास करणे शक्य  होणार आहे.

**२. संशोधनाची परीमर्यादा:**

१. सदर संशोधनातमहाराष्ट्र राज्यातील प्राथमिक शिक्षणासाठी सापगाव (ता.शहापूर जि.ठाणे) केंद्रात राबविल्या जाणाऱ्या विद्यार्थी लाभाच्या योजनांचा मूल्यमापनात्मक अभ्यास केलेला आहे.

२. प्रस्तुत संशोधनातील संशोधन हे सन २०२२-२३ या शैक्षणिक वर्षाकरिता मर्यादित आहे.

**९. सबंधित साहित्य व संशोधनाचा आढावा:**

प्रस्तुत संशोधनासाठी खालीलप्रमाणे आढावे घेण्यात आले.

सबंधित संशोधन साहित्याच्या आढाव्यासाठी १२ संदर्भ ग्रंथाचा वापर केला.

त्याचप्रमाणे पीएचडी स्तरावर ६ संशोधन प्रबंध,एम फील स्तरावर २ संशोधन प्रबंध, एम एड स्तरावरील १ संशोधन अहवालाचा, तसेच नियतकालिके, विविध रिपोर्ट्स व शासनाच्या वेबसाईटचा आढावा घेण्यात आला.

**१०.संशोधन पद्धती:**

सदर संशोधनासाठी संशोधकाने सर्वेक्षण पद्धतीचा वापर केला आहे.त्यासाठी Google Form या सॉफ्टवेअर ची मदत घेऊन प्रश्नावली तयार करण्यात आली.

**११. संशोधनाची जनसंख्या:**

प्रस्तुत संशोधनासाठी सापगाव (ता.शहापूर जि.ठाणे) केंद्रातील जिल्हा परिषद शाळांमध्ये शिकवणारे ४९ शिक्षक हि प्रस्तुत संशोधनाची जनसंख्या आहे.

**१२. संशोधन नमुना:**

सदर संशोधनासाठी संभाव्यतेवर आधारित सहेतुक नमुना निवड पद्धतीने नमुना निवड केली आहे .

न्यादर्श म्हणून ४९प्रतीसाद्कांपैकी सर्वच ४९ प्रतीसाद्कांची निवड केली आहे

**१३. संशोधनाची साधने:**

प्रस्तुत संशोधनामध्ये सर्वेक्षण पद्धतीचा अवलंब केल्याने संशोधकाने स्वनिर्मित ऑनलाईन चाचणीचा वापर केलेला आहे.प्रतिसादकांना ऑनलाईन चाचणीव्दारे आपली मते देण्यास प्रवृत्त केले होते.

ISSN: P-2455-0515
E- 2394-8450

Educreator Research Journal

VOLUME–IX, ISSUE– V SEPT – OCT 2022

Original Research Article

**१४. संख्याशास्त्रीय विश्लेषण;**

संशोधनासंदर्भात प्राप्त सामग्रीचे विश्लेषण हे गुगल फॉर्म व्दारे ऑनलाईनशेकडेवारी उपलब्ध झाली.विश्लेषण व अर्थनिर्वेचन करण्यासाठी शेकडेवारी या संख्याशास्त्रीय साधनांचा वापर करण्यात आला.

**१५. उद्दिष्टांनुसार निष्कर्ष:**

**उद्दिष्ट क्र.१.**

महाराष्ट्र राज्यातील प्राथमिक शाळांमध्ये राबविल्या जाणाऱ्या विद्यार्थी लाभाच्या योजनांचा अभ्यास करणे.

**निष्कर्ष:**

१. वर्तमान स्थितीत राबविल्या जाणाऱ्या योजनांची प्रभावी अंमलबजावणी होत असली तरीही त्यात अजून सुधारणा करणे आवश्यक आहे .

२. सद्यस्थितीत राबविल्या जाणाऱ्या १.मोफत पाठ्यपुस्तके योजना,२.मोफत गणवेश योजना, ३.मध्यान्ह भोजन योजना या योजनांची ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांसाठी नितांत आवश्यकता आहे.

**उद्दिष्ट क्र.२.**

१. महाराष्ट्र राज्यातील प्राथमिक शाळांमध्ये राबविल्या जाणाऱ्या योजनांमधील त्रुटी शोधून उपाययोजना सुचविणे.

**निष्कर्ष:**

१. वर्तमान स्थितीत राबविल्या जाणाऱ्या योजनांमुळे विद्यार्थ्यांच्या उपस्थितीचे प्रमाण वाढले आहे.

२. महाराष्ट्र राज्यातील सर्व प्राथमिक शाळांमध्ये पाठ्यपुस्तके शाळेच्या पहिल्याच दिवशी वितरीत केल्या जातात.तरी सुद्धा शालेय पोषण आहार या सारख्या योजनांमध्ये पोषण आहाराचे धान्य वेळेत शाळेपर्यंत पोहोचवणे यासारख्या सुधारणा होणे गरजेचे आहे.

३. वर्तमान स्थितीत राबविल्या जाणाऱ्या योजनांमुळे विद्यार्थ्यांची शाळांमधून होणारी गळती बऱ्याच प्रमाणात कमी झाली आहे, असे असले तरीही सर्वांना शिक्षणाचा हक्क मिळण्यासाठी १००%. टक्के गळतीथांबवणे गरजेचे आहे.

**१६.मुख्य निष्कर्ष:**

१. महाराष्ट्रराज्यातील प्राथमिक शाळांमध्येराबविल्या जाणाऱ्या विद्यार्थी लाभाच्या योजनांची प्रभावी अंमलबजावणी होते आहे, असले तरी सद्यस्थितीत राबविल्या जाणाऱ्या योजनांचे पुनर्मुल्यांकन करणे आवश्यक आहे.

२. महाराष्ट्रराज्यातील प्राथमिक शाळांमध्ये राबविल्या जाणाऱ्या विद्यार्थी लाभाच्या योजनांचादैनंदिन उपस्थिती व अध्ययन संपादणूक यावर सकारात्मक परिणाम होतो त्यामुळे सद्यस्थितीत १.मोफत पाठ्यपुस्तके योजना,२.मोफत

ISSN: P-2455-0515
E- 2394-8450

Educreator Research Journal

VOLUME–IX, ISSUE– V SEPT – OCT 2022

Original Research Article

गणवेश योजना, ३.मध्यान्ह भोजन योजना या योजनांची ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांसाठी नितांत गरज आहे.त्यामुळे सद्यस्थितीतील योजनांमध्ये आवश्यक सुधारणा करून या योजना आगामी काळात चालू ठेवल्या पाहिजेत.

**संदर्भसूची:**

**पुस्तके:**

१. डॉ.वि.रा.भिंताडे (२०११), शैक्षणिक संशोधन पद्धती,नित्यनूतन प्रकाशन,पुणे.

२. दांडेकर वा.ना. (१९७४): शैक्षणिक संशोधन व संख्याशास्त्र,श्रीविद्या प्रकाशन,पुणे.

३. डॉ. विनोद रायपुरे : आदिवासी शिक्षणातील शासकीय योजना, प्रशांत पब्लिकेशन्स,जळगाव

४. मुख्याध्यापक मार्गदर्शिका, महाराष्ट्र राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद (विद्या परिषद) पुणे.

५. राजेश रमण (२०१७) : स्कुली शिक्षा और मिड डे मील,प्रभात पब्लिकेशन्स

६. शैलजा भंगाळे (२०२०) : शालेय व्यवस्थापन,प्रशांत पब्लिकेशन्स,जळगाव

**नियतकालिके व माहिती पुस्तिका:**

१. बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा हक्क अधिनियम २००९

२. लोकसत्ता (शिक्षणाचा खेळ खंडोबा,कृष्णा खोत)https://www.loksatta.com/lokrang/lekha/maharashtra-education-in-a-bad-condition-due-to-wrong-government-decision-1643340/

३. शिक्षणाचा हक्क अधिनियम -२००९ मार्गदर्शिका, महाराष्ट्र राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद पुणे.

**शासन निर्णय व परिपत्रके:**

१. अल्प संख्यांक शिष्यवृत्ती योजना, शासन निर्णय क्रमांक : आविवि – २०११/प्र.क्र.४४/११/का.६ दिनांक : १४ मे २०११

२. अहिल्याबाई होळकर मोफत बस प्रवास(मुलींसाठी) योजना, शासन निर्णय क्रमांक : एफईडी – १०९६/८४८८३/(१९५७/९६)/साशि – ५ दिनांक : १३ ऑगस्ट १९९६

३. उपस्थिती भत्ता योजना, शासन निर्णय क्रमांक : पीआरई/१०९१/९६१४/ प्राशि/१ दिनांक : १० जानेवारी १९९२

४. मोफत पाठ्यपुस्तके योजना, शासन निर्णय क्रमांक : पीआरई २०००/(२४७०)/प्रा.शि. – १ दिनांक : १८ जानेवारी २००२

५. मध्यान्ह भोजन योजना, शासन निर्णय क्रमांक : शापोआ - २००४/प्र.क्र.२४६/०४/प्राशि/०४ दिनांक : १३मार्च २००५

६. शिक्षणाचा हक्क अधिनियम – २००९, महाराष्ट्रात लागू शासन परिपत्रक क्र.२००९/प्र.क्र.२९२/प्राशि१,दिनांक १०मे ,२०१०.

ISSN: P-2455-0515
E- 2394-8450

Educreator Research Journal

VOLUME–IX, ISSUE– V SEPT – OCT 2022

Original Research Article

७. समग्र शिक्षा अंतर्गत मोफत गणवेश योजना, शासन निर्णय क्रमांक : डीसिटी – २३१८ /प्र.क्र.७२/का.१४१७ दिनांक : ४ जुन २०१९

८. सावित्रीबाई फुले दत्तक पालक योजना, शासन निर्णय क्रमांक : स्त्रीशिम – १०९३/(९३८) प्राशि – २ दिनांक : ३ एप्रिल १९९३

९. सुवर्ण महोत्सवी आदिवासी पूर्व माध्यमिक शिष्यवृत्ती योजना, शासन निर्णय क्रमांक : आविशि – २००९/प्र.क्र.२०/का.१२ दिनांक : ३१मे २०१०

**संकेतस्थळे:**

1. http://mpsp.maharashtra.gov.in
2. https://student.maharashtra.gov.in
3. https://udiseplus.gov.in/udiseplus/blockDashboard
4. www.ibe.unesco.org/en/glossary-curriculum-terminology/p/primary-education
5. www.inflibnet.in
6. www.maharashtra.gov.in
7. www.outofchildreninindia.com
8. www.ssa.nic.in
9. www.unesco.ifs
10. www.wikipedia.org

*Cite This Article:*

**प्रकाश तुकाराम चव्हाण व **प्रा. डॉ. कैलास आर. खोंडे, (2022).* प्राथमिक शिक्षणाच्या सार्वत्रिकीकरणासाठी राबविल्या जाणाऱ्या विविध योजनांची अंमलबजावणी: एक अभ्यास, ***Educreator Research Journal, Volume–IX, Issue– V, Sept – Oct 2022, 113-120.***